| | | |
|---|---|---|
| १७९९ | सदस्य सुचवतील तेथे सोलापूर शहरात विविध ठिकाणी पिण्याचे पाण्याची पाईपलाईन घालणे | १५.०० |
| १८०० | सदस्य सुचवतील तेथे सोलापूर शहरात विविध ठिकाणी मेंटनन्सची कामे करणे | १०.०० |
| १८०१ | सार्वजनिक कार्यालयात (वाचनालय, अभ्यासिका) या ठिकाणी संगणक खरेदी करीता | ५.०० |
| | एकूण | ७२६७.२७ |



# मा. स्थायी समिती सदस्य


मा. …ली श्रीनिवास आशप्पा


मा.संजय बसप्पा कोळी
अध्यक्ष, स्थायी समिती


मा. वल्याळ नागेश लिंगराज


… (आंस) गायकवाड


मा. रिकमल्ले श्रीनिवास जगन्नाथ


मा. कंपली मिनाक्षी मारेप्पा


… प्रमोद हुच्चे


मा.बिराजदार-पाटील राजश्री अशोक


मा. कोठे महेश विष्णुपंत

# मा. स्थायी समिती सदस्य



मा. कोटा विठ्ठल आशप्पा



मा. धुत्तरगांवकर गुरूशांत धुंडप्पा



मा.कोळी नरसिंग नरसप्पा



प्रविण(दादा)उत्तमराव



मा. नागेश अण्णा गायकवाड



मा.तौफिक इस्माईल शेख(पैलवान)



मा. चंदनशिवे आनंद बाबुराव

मा. स्थायी समितीने अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेले सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक 'अ' व 'क' चे संदर्भात



मा.श्री. संजय बसप्पा कोळी

अध्यक्ष - स्थायी समिती

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

मा. महापौर व सभासद बंधू भगिनींनों,

सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक 'अ' व 'क' आपल्यापुढे सादर करीत आहे.

मा.स्थायी समितीच्या अध्यक्षपदी आमची दिनांक १८/३/२०१७ रोजी निवड झाली आहे. या नंतर मा.आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर मा.स्थायी समिती सदस्या समवेत विचारविनिमय करुन मा.स्थायी समितीने फेरबदल करुन, अंदाजपत्रक मा.महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी मर्यादित स्वरुपाच्या असल्या तरी त्यापासून येणाऱ्या उत्पन्नाच्या वसुलीमध्ये अत्यंत शितलता आलेली आहे. त्यामुळे थकीत झालेल्या रक्कमा मोठ्या प्रमाणात दिसून येतात.मा. आयुक्त यांनी सन २०१७-१८ च्या महसुली व भांडवली अंदाजपत्राकाचा सविस्तर अभ्यास करून मा. स्थायी समितीच्या सदस्या समवेत व संबंधित खाते प्रमुख यांच्या बरोबर प्राथमिक स्वरूपात चर्चा करून, मा. स्थायी समितीने जमा बाजूमध्ये चालु बाकी व थकबाकी वसुलीसाठी विशिष्ट व प्रभावीपणे नियोजन करून व म.न.पा. च्या उत्पन्नाचा इतर बाबीपासून उत्पन्न वाढीला प्राधन्य देऊन उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच खर्चाच्या बाबीचा विचार करता आजपर्यंत खर्चावर नियंत्रण नव्हते असे म्हणणे चुकीचे होणार नाही. ही बाब गंभीरतेने घेऊन अनावश्यक खर्च काटेकोरपणे कमी करण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे.

आयुक्तांनी महसुली जमेचा अंदाज ४९४,३४,४६,०००/- इतके सादर केलेले होते त्यामध्ये मा. स्थायी समितीने पुर्ण विचाराअंती ४६,३०,००,०००/ इतकी वाढ सुचविली आहे. तसेच महसुली खर्च बाबीकडे अगदी काटेकोरपणे अनावश्यक खर्च बाबीमधील टाळून एकूण १३,९९,४९,०००/ इतकी रक्कम बचत केलेली आहे. महसुली जमा खर्चाच्या माध्यामातून ६०,२९,४९,०००/ इतकी रक्कम आयुक्तांच्या अंदाजापेक्षा जास्त उपलब्ध करून ती रक्कम शहराच्या विकास कामासाठी भांडवली विभागाकडे वर्ग करण्यांत आलेली आहे.

आजपर्यंत महानगरपालिकेमधील नगरसेवकांनी सुचविलेल्या कामावर आधारित अंदाजपत्रक तयार केले जात होते. परंतू या वेळेस पहिल्यांदाच जनतेला

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

**मा. स्थायी समितीचे दि. ३१/३/२०१७ चे**
**सभेपुढे विषय क्र. १०६८ ठराव क्र. १०४३ अन्वये**
**खालील प्रमाणे ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सन २०१६ –१७ चे सुधारित व सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक 'अ' व 'क' मा. आयुक्त यांनी दिनांक २८/०२/२०१७ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेले आहे.

प्रस्तुत सन २०१६–१७ चे सुधारित तसेच सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक उक्त अधिनियमाच्या कलम ९६ नुसार शिफारस होवून कलम १०० अन्वये मा. महानगरपालिकेची मान्यता मिळणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले. मा.आयुक्त यांनी सन २०१६–१७ चे सादर केलेले सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव मा. म.न.पा. कडे शिफारस करणेत येत आहे. तसेच सन २०१७–१८ चे अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमाणे फेरबदल करणेत येत असून, त्यास व सूचना शिफारशीसह कलम १०० अन्वये मान्यता मिळणेस्तव मा. महानगरपालिकेकडे शिफारस करणेत येत आहे.



अपेक्षित असलेल्या विकास कामाचे अंदाजपत्रक सादर करण्यामध्ये मला अतिशय आनंद होत आहे.

तसेच भांडवली विभागामध्ये जमा बाजूकडे र.रू. १४,८०,००,०००/ उपलब्ध केलेली आहे. अशा प्रकारे भांडवली विभागाकडे र.रू. ७५,१०,००,०००/ इतकी रक्कम आयुक्तांनी सुचविलेल्या रक्कमेव्यातिरिक्त विकास कामासाठी उपलब्ध झालेली आहे. आणि या अतिरिक्त उपलब्ध झालेल्या रक्कमेतून जास्तीत जास्त रक्कम आजपर्यंत अन्याय झालेल्या हद्दवाढ भागातील नागरिकांच्या सोयीसाठी व शहरातील इतर आवश्यक बाबींसाठी जास्तीत जास्त खर्च करण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केलेला आहे.

तसेच पाणी पुरवठ्याच्या क विभागाचे अंदाजपत्रकामध्ये आजपर्यंत प्रतिवर्षी तुट दाखविली जात होती. या क अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास करून त्यामधील आवश्यक बाबीसाठी योग्य अशा तरतुदी करून तुटीची रक्कम कमी करून तुटीची परिस्थिती नष्ट करून पाणी पुरवठा हा विभाग फायद्या मध्ये आणलेला आहे. ती फायद्याची अतिरिक्त रक्कम पाणी पुरवठ्याच्या भविष्यकाळात पाणी पुरवठा सुधारणेसाठी राखून ठेवण्यांत आली आहे. या चालू आर्थिक वर्षापासून पाणी पट्टीमध्ये ५० टक्क्याची कपात व युजर चार्जेसची पुर्णपणे कपात करणेबाबत व त्रस्त झालेल्या नागरिकांना एक मोठा दिलासा देण्याच्या प्रयत्न आम्ही केला असून, त्याबाबत मा.म.न.पा. कडे शिफारस करण्यांत आलेली आहे.

तसेच शहर व हद्दवाढ भागातील विविध विकास कामे करण्यासाठी शहरातील सदस्यांना २५ लाख व हद्दवाढ विभागातील सदस्यांना प्रत्येकी ३० लाखाची निधी देण्याबाबत प्रस्तावित करण्यांत आलेले आहे.

हा सगळा प्रयत्न केवळ अतिशय प्रामाणिकपणे व शहरातील नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी झालेला असून, या कामी मा. पदाधिकारी, मा. स्थायी समिती सदस्य, मा. आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी मला वास्तविक सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचा व्यक्तीशः आभारी आहे.

मा. स्थायी समितीने तयार करून शिफारस केलेल्या सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक त्याच्या सूचना व शिफारशीसह मा. महानगरपालिकेने मंजूर करावे, अशी माझी विनंती आहे.

**(संजय बसप्पा कोळी)**
**अध्यक्ष स्थायी समिती,**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.